# भारतीय विचारवंत



संपादक

डॉ. नीलम छंगाणी　　डॉ. नितीन चौधरी

भारतीय विचारवंत : डॉ. नीलम छंगाणी, डॉ. नितीन चौधरी

**प्रकाशक :**

अॅड. कु. जे. व्हि. भगत
अजिंक्य प्रकाशन
भिमनगर, वापटा पो. कुपटा
ता. मानोरा जि. वाशिम

**संपर्क** : ९६०४४०२०५३
WhatsApp : 8007143527
Website : www.ajinkyapublication.com
E-mail : ajinkyapublication@gmail.com

**ISBN :978-93-90532-20-9**

© लेखकाधिन

**प्रथम आवृती** : जानेवारी २०२१
**अक्षर जुळवणी** : अजिंक्य प्रिंटीग्स् अॅण्ड कॉम्प्यूटर्स
**मुखपृष्ठ** : अरविंद मनवर
**मुद्रक** : अजिंक्य एन्टरप्राईजेस, वाशीम
**प्रमुख विक्रेता:** अजिंक्य पुस्तकालय, वाशिम
**संपर्क** : ८००७१४३५२७ / ९६०४४०२०५३
**किंमत : रू.४५० फक्त**

(या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील राष्ट्रीय जागृती विषयक विचार / प्रा. भास्कर धारणे | ०१ |
| २. | जोतीराव फुले लिखित 'गुलामगिरी' या वैचारिक ग्रंथातील मूल्यविचार / डॉ. कैलास वानखडे | ०६ |
| ३. | युवक कल्याणासंबंधी स्वामी विवेकानंद यांचे विचार / डॉ. अलका मानकर | १२ |
| ४. | म. फूलेंचे ब्रिटीश शासनाविषयी विचार / प्रा. डॉ. दत्ता कुंचलेवाड | १८ |
| ५. | भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. एस. व्ही. केतकर यांचे जातीव्यवस्थेसंबंधीचे विचार - एक समाजशास्त्रीय अध्ययन / डॉ. संजय ब. चौधरी | २३ |
| ६. | डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख / डॉ. माधव सोनेकर | २८ |
| ७. | म. गांधी थोर विचारवंत / डॉ. राजेश्री कडू | ३७ |
| ८. | पंडीत नेहरू : एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व / प्रा.डॉ. सुधिर देशमुख | ४२ |
| ९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठीवाड्मयासंबंधीचे विचार / डॉ. संदीप बनसोडे | ४६ |
| १०. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान / प्रा. कुमुद चारमोडे | ५१ |
| ११. | बाराव्या शतकातील धर्मप्रवर्तक श्री. चक्रधरस्वामी / डॉ. माधुरी पाटील | ५८ |
| १२. | जयप्रकाश नारायण यांचा समाजवाद / डॉ. संदीप काळे | ६१ |
| १३. | स्वामी विवेकानंद : विश्व मानव / डॉ. अर्चना धर्मे | ६६ |
| १४. | थोर भारतीय समाजशास्त्रज्ञ – डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये / डॉ. बळीराम अवचार | ७० |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठीवाड्मयासंबंधीचे विचार

डॉ. संदीपअ. बनसोडे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
र. भ.अट्टल महाविद्यालय गेवराई जि. बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा एक विचारवंत म्हणून जर विचार केला तर तो सर्वच क्षेत्रात करावा लागेल कारण त्यांना संशोधक, पत्रकार, लेखक, समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, इतिहासकार, संविधानाचे जनक, तत्वज्ञानी, मानववंशशास्त्रज्ञ, दलित आणि महिला अधिकारांचे उध्दारक, पाली बौध्द साहित्याचे अभ्यासक, देशातील पहिले कामगारमंत्री, संस्कृत, मराठी हिंदी साहित्याचे अभ्यासक, राजनीतीतज्ज्ञ, विज्ञानवादी, जलतज्ज्ञ, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते, शेतकरी, गोरगरीब कामगरांचे उध्दारक संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर असा कॅलिडोस्कोपिक अशा अर्थाने त्यांचा उल्लेख नेहमी होत आला आहे आणि भविष्यातही होत राहील, तो तसा होणेही आवश्यक आहे कारण उपरोक्त सर्वच क्षेत्रात आंबेडकरांनी आपली संपूर्ण हयात घालवली मात्र लघुशोधनिबंधाच्या सोयीसाठी येथे विचारवंत म्हणून आंबेडकर यांचा आपण मराठी भाषा अभ्यासक म्हणून त्यांचा विचार करणार आहोत.

डॉ. आंबेडकर यांच्या ग्रंथ प्रेमाचा विचार केलाअसता त्यांचे ग्रंथप्रेम हे काही एका विशिष्ट विषयापुरते मर्यादित नव्हते सर्व प्रकारचे विषय त्यांना ज्ञानार्जनासाठी महत्वाची वाटत आणि म्हणून आपल्या भारत देशातील नव्हे तर पाश्चात्य देशातील पुस्तकांवरही त्यांचे नितांतप्रेम होते पाश्चात्य ग्रंथकार याबरोबरच भारतीय आणि विशेषतरू मराठी भाषेतीलवाड्मय ते तितक्याच आवडीने वाचत असत. वाड्मयाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी विलक्षण होती. पुस्तकांमध्ये जे जे मांडले आहे ते सर्वच सत्य असते यावर त्यांचा कधीही विश्वास नव्हता, तर ग्रंथात दिलेली कुठलीही एखादी बाब कितपत सत्य आहे हे जाणून घेण्यासाठी ते त्याच्या मुळाशी जाण्याचा पूर्णपणे प्रयत्न करीत असत आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे ग्रंथप्रेम हे जगजाहिर झालं. त्यांनी अनेक वाड्मय प्रकार हाताळले असले तरी डॉ आंबेडकर हे संत वाडमयाचे गाढे अभ्यासक होते असे आपल्या लक्षात येते परंतु असे जरी असले तरी संत वाड्मयाकडे आंबेडकरांनी कधीही सांप्रदायिक दृष्टिकोनातून पाहिले नाही. संत हे महाराष्ट्राचे दैवत असतात ते भाग्यविधाते असतात या सर्व बाबींना ते पूर्णपणे पाहून सुलाखून पहात. संतांचे संतपण, संतांनी सामाजिक न्यायासाठी केलेला संघर्ष आणि यासारखी अनेक विधान तपासून पाहिल्याशिवाय डॉ. आंबेडकरांना चैन पडत नसे. पूर्णतः अभ्यास केल्याशिवाय एखाद्या गोष्टीचा गौरव करणे हा स्वभाव बाबासाहेब आंबेडकरांचा मुळीच नव्हता आणि या भावनेतून त्यांनी संत वाड्मयाबद्दल कधीच भाष्य केले नाही, सांप्रदायिक श्रद्धेतून त्यांनी या ग्रंथाकडे पाहिले नाही मात्र

संतांच्या शिकवणुकीचा ते आवर्जून पुरस्कार करताना दिसून येतात कारण त्यांना हे ज्ञात होते की नैतिक शिकवण लोकजीवनाला नवे आयाम प्राप्त करून देऊ शकते.

संतांनी सामाजिक क्रांती केली या बाबीला त्यांनी कधीही मान्यता दिली नाही, चातूर्वणाविरुद्ध महाराष्ट्रामध्ये अनेक बंड झाली मात्र केवळ बंड करून समाजामध्ये बदल घडवता येत नाही बंड हे केवळ समाजाला हादरा देऊ शकते तर समाजामध्ये बदल घडवायचा असेल तर त्यासाठी क्रांतीच करावी लागते असे त्यांचे विचार होते. म्हणजेच क्रांती आणि बंड या दोन निराळ्या गोष्टी आहेत असे त्यांचे मानणे होते हे साधारणतः बंड हे नेहमीच अपयशी ठरते मात्र क्रांती ही समाज जीवनात बदल घडवू शकते असाच विश्वास आंबेडकरांना होता. बहिष्कृत भारत या त्यांच्या पाक्षिकात आंबेडकर म्हणतात, मानवी ब्राम्हण श्रेष्ठ की भक्तश्रेष्ठ असा तो लढा होता. ब्राह्मण मानव श्रेष्ठ की शुद्ध मानव श्रेष्ठ हा प्रश्न सोडविण्याच्या भरीत साधुसंत पडले नाहीत या बंडात साधुसंतांचा जय झाला व भक्ताचे श्रेष्ठत्व ब्राह्मणांना मान्य करावे लागले तरीसुद्धा या बंडाचा चातुर्वर्ण्य विध्वंसनाच्या दृष्टीने काहीच उपयोग झाला नाही. “संतांनी चातुर्वर्ण्याला किंचितही धक्का लावला नाही” ते त्यांचे ब्रिद नव्हते त्यांनी शूद्रांच्या गळ्यातील दास्यत्वाच्या पट्ट्याला बोट सुद्धा लावून दाखविले नाही, असे फुले म्हणतात ते याच अर्थाने. संतांनी भक्ती प्रतिपादिली आणि भक्तीतच त्यांनी जीवनाचे सार्थक पाहिले हे बाबासाहेबांचे मत तर्कशुद्ध आहे. भक्तीच्या मुलाम्याने माणुसकीला किंमत येते ही मिथ्या आहे, माणुसकीची किंमत स्वयंसिद्ध आहे पण यासाठी संतांनी लढा उभारला नाही हा बाबासाहेबांचा आक्षेप आहे. संतांचे बंड हे जरी असले तरी ते परिणामासाठी नसून ते दुष्परिणामासाठी आहे. एका ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, “संतांच्या बंडाचा एक मोठा दुष्परिणाम झाला तुम्ही चोखामेळा सारखे भक्त व्हा मग आम्ही तुम्हाला माणूस असे म्हणून दलित वर्गाची वंचना करण्याचा एक नवा उपाय मात्र त्यामुळे ब्राह्मणांच्या हाती सापडला.”

एखादा चोखामेळा जन्माला आला म्हणून त्याचा संबंध समाज उन्नत आवडते लागेला असे म्हणणे चुकीचे ठरेल आणि म्हणून एखादा चोखामेळा कर्तुत्ववान असला म्हणून संपूर्ण समाज कर्तुत्ववान म्हणता येईल येईल असे नव्हे. याच धर्तीवर डॉ. आंबेडकर हे हे वैयक्तिक कर्तबगारी आणि सामुदायिक कर्तबगारी यात भेद करताना दिसून येतात वैयक्तिक कर्तबगारी ही आदरणीय असतील पण ती अनुकरणीय असेलच असे नव्हे म्हणजे दलित समाजातील काही ही जण शिकून उन्नत अवस्थेला पोचले असले तरी त्यांचा संपूर्ण समाज हा प्रगल्भ प्रगत झाला असे आपणास म्हणता येणार नाही. डॉ. आंबेडकरांनी कर्मविपाकाचा सिद्धांत अंधश्रद्धा आणि वर्णाश्रमधर्माचा पुरस्कार नाकारला होता. बुद्धिप्रामाण्यवादाच्या दृष्टिकोनातूनच त्यांनी संत वाङ्मयाचा विचार केल्याचे दिसून येते, पण हा बुद्धिवाद शुष्क नव्हता तर, समग्र समाजाच्या प्रगतीचा समतेचा पुरस्कार करणारा होता आणि म्हणून संत वाङ्मयामध्ये हे मुरलेले आध्यात्मिक तत्वज्ञान आंबेडकरांनी नाकारले पण नैतिक शिकवणूक मानवी जीवितास उपकारक ठरते असेही विचार त्यांनी संत वाङ्मयाबद्दल समोर ठेवले आहेत.

केवळ संत वाङ्मयअभ्यासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर थांबत नाही, तर विविध संप्रदायांचा अभ्यास करतानाही ते दिसून येतात, धर्माबद्दलची चिकित्सा करताना दिसून येतात आणि त्याबद्दलची त्यांची जिज्ञासा वृत्तीही आपल्या लक्षात आल्यावाचून राहत नाही.

दत्त संप्रदाय आणि महानुभाव पंथ हे खरेतर महाराष्ट्रातील दोन महत्त्वाचे पंथ आहेत याबद्दल आपले विचार व्यक्त करताना आंबेडकर म्हणतात "दत्तसंप्रदाय हा सोवळ्या-ओवळ्या व जातिभेदविषयक निर्बंध बाकी बऱ्याचशा संप्रदायांपेक्षा विशेष कडकपणाने पाळणारा आहे." ब्राह्मण वर्गाने आपले धर्मासंबंधीचे नियम अगदी काटेकोरपणे पाळले पाहिजेत शूद्रादिकांच्या घरी त्यांनी जाऊ नये अथवा त्यांच्या घरी जाऊन अन्न सेवन करू नये, वेदाच्या लौकिकाचा शास्त्राच्या आणि कुलाचाराचे पालन ब्राह्मणांनी या पद्धतीने करावे असे कठोर दंडक किंवा ज्याला नियम म्हणता येईल ते दत्त संप्रदायात असल्याचे दिसून येते. या नियमांना पाहून अभ्यास करताना डॉ. आंबेडकरांना प्रश्न पडतो की खरोखरच दत्तसंप्रदाय हा सुरुवातीला इतका कडवट होता का ? आणि याचे उत्तर देताना ते पुढे म्हणतात, की गुरुचरित्र हा दत्त संप्रदायाचा प्रमाणग्रंथ अस्तित्वात येईपर्यंत तरी अशी परिस्थिती नव्हती वास्तविक पाहता दत्त हे दैवात स्वतः सोहळे आहे असा प्रकार नाही दत्तात्रेयाचा साक्षात्कार मलंगाच्या वेषाने एकनाथादी साधुंना झाल्याची वर्णने जुन्या पुस्तकांमध्ये आढळतात आणि गुरुचरित्राच्या पोथीचा प्रसार होईपर्यंत दत्तसंप्रदाय आला. हल्लीचे कडक सोहळेपणाचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते असे म्हणावयास हरकत नाही. म्हणजे गुरुचरित्र पूर्वी असलेला कडक सोवळेपणाआणि दत्तसंप्रदायाची मूळ विचारसरणी व नंतर दत्त संप्रदायाच्या शिकवणुकीत घडलेले परिवर्तन यास कारणीभूत भक्तच आहेत असे लक्षात येते, याच भक्तांबद्दल आपली भूमिका मांडताना आंबेडकर म्हणतात की, "भक्त मंडळी स्वतःच्या समजुती आपल्या उपास्यावर लादत असते. भक्त सोवळे तर देवही सोवळा, भक्त उदारमतवादी तर देवही उदारमतवादी, भक्त हिंसा प्रिय तर देवही हिंसाप्रिय, भक्तलाच खाऊ तर देवही लाचखाऊ, भक्त शीघ्रकोपी तर देवही शीघ्रकोपी असेच सर्वत्र दिसून येते." अशाप्रकारे परखड मर्मभेद आणि प्रसंगी उपरोधिक परंतु सत्य परिस्थिती ला दर्शविणारे असे वर्णन डॉ. आंबेडकर करताना दिसतात.

दत्त संप्रदाय आणि महानुभाव पंथ यांची तुलना करताना आंबेडकरांनी तत्व आणि आचारधर्म यांचा आधार घेतला आहे आणि हीच त्यांच्या चिकित्सक आणि संशोधनपरतेची साक्ष आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर प्राचीन साहित्यात अधिक रमत असत त्या साहित्याच्या संबंधाने आपले विचार प्रकटही करत असत आधुनिक मराठी साहित्य विशेषतः नाटके ते आवर्जून वाचतात, परंतु या साहित्याच्या अनुषंगाने त्यांनी मतप्रदर्शन केल्याचे आढळून येत नाही. मात्र लोकसाहित्याच्या अभ्यासाची दिशा कशी असावी यासंबंधाने भाष्य करताना बाबासाहेब दिसतात. या संबंधाने त्यांनी जनता या त्यांच्या पाक्षिकात जुन्या वांग्मयाचा जीर्णोद्धार

या नावाचा लेख प्रसिद्ध करून स्वतःचे लोकसाहित्याच्या संबंधीचे मत व्यक्त केले आहे, लोकजीवनाशी निगडित असणाऱ्या लोकसाहित्याकडे किंवा लावणी वाङ्मयाकडे मराठी अभ्यासक फारसे लक्ष देत नाहीत. अशी तक्रार बाबासाहेब नेहमी करत. त्यांचे असे मत होते कि लोकसाहित्याचे वाङ्मय म्हणजे मराठीला भूषण वाटावे असे आहे. ते दुर्लक्षित करणे किंवा त्या संबंधाने उदासीन असणे आंबेडकरांना नेहमीच गैर वाटत होते, त्यांनी विचार प्रकट केलेल्या एका लेखात एके ठिकाणी ते म्हणतात, "लावणी आणि गाऱ्हाणे ही कमी प्रतीची, असे जरी मानले तरी लालित्य आणि नवलाई यांच्या दृष्टीने अशा प्रकारच्या वाङ्मयप्रकाराला कमी मानता येणार नाही."

गाऱ्हाणे हा लोकसाहित्यातील एक सांस्कृतिक जीवनाचा अविष्कार होय. डॉ. बाबासाहेबांनी जुन्या वाङ्मयाचा जीर्णोद्धार या लेखात, सावंतवाडी संस्थानातील झाराप या गावी पांडूची पाथर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भागातील चाळोबा या ग्रामदेवतेला महारांनी घातलेले गाऱ्हाणे उद्धृत केले आहे. हे देव किंवा देवता केवळ कल्पनेतून निर्माण होतात किंवा सामाजिक तंत्राप्रमाणे त्यांना आकार दिला जातो असे नाही. माणसाला शारीरिक व मानसिक पंगुत्व आले म्हणजे त्याच्या भावना जेथे गुंतत जातात तेथे देव दैवते साकार होतात. चाळोबा हे असेच एक साकार रूप आहे, बाबासाहेब म्हणतात "दैवते जमाती व स्थानिक असतात" चाळोबा हे असेच महार जमातीचे स्थानिक दैवत आहे. या दैवताला गाऱ्हाणे घालणे म्हणजे देवतेची आराधना करणे आणि आपल्या इच्छा आकांक्षा यांच्या फलश्रुतीसाठी देवतेला साकडे घालणे होय. समाराधनेनंतर सामुहिक भोजन व त्यानंतर महाराने क्रमाने सत्तावीस कलमांचा उच्चार करीत जायचे आणि प्रत्येक कलमानंतर समूहाने 'होय म्हाराजा' असे विशिष्ट सुरात म्हणायचे उदाहरणार्थ

बा द्यावा म्हाराज्या चाळोबा.....व्हयम्हाराज्या

साठतीनशे गावाच्या चाळया...व्हय म्हाराज्या तर म्हाराज्या आज तुका समशदनाहोना ठेवलो होतो मान्य करून घे, गावगिरी मांचा कल्याणकर....व्हय म्हाराज्या

आणि केल्ल्या कामात यास देऊनकल्याण कर रे म्हाराज्या.....व्हय म्हाराज्या

अशाप्रकारे लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या साहित्याच्या अभ्यासावर डॉ. आंबेडकरांनी लक्ष केंद्रित केले होते. ते याबाबत म्हणतात, "जुन्या आणि नव्या मराठी वाङ्मयाचा परीघ तपासून पाहताना, हल्लीच्या चालू वाङ्मयतून जुने वाङ्मय गळून पडले आहे, नव्हे नामशेष झाले आहे, असे म्हणणे आतताईपणाचे होणार नाही, असे मला निश्चितपणे वाटते." गेल्या काही दशकात लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचा होत असलेला अभ्यास पाहिला की डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे किती यथार्थ होते याचा प्रत्यय येतो.

**संदर्भ :**

१. समतेसाठीच ही विषमता - बहिष्कृत भारत, १ फेब्रुवारी १९२९

२. समतेसाठीच ही विषमता - बहिष्कृत भारत, १ फेब्रुवारी १९२९

३. दत्तदरबाराचे उदाहरण- प्रासंगिक विचार - बहिष्कृत भारत ६ सप्टेंबर १९२९

४. दत्तदरबाराचे उदाहरण - प्रासंगिक विचार - बहिष्कृत भारत ६ सप्टेंबर १९२९

५. दत्तदरबाराचे उदाहरण - प्रासंगिक विचार - बहिष्कृत भारत ६ सप्टेंबर १९२९.

६. जुन्या वाङ्मयाचा जीर्णोद्धार - जनता ०२ ऑगस्ट १९९२

७. धर्म आणी लोकसाहित्य - दुर्गाभागवत, पृष्ठ क्र दोन

८. जुन्या वाङ्मयाचा जीर्णोद्धार - पूर्वोक्त

मुख्य स्त्रोत

पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखक गंगाधर पानतावणे, प्रतिमा प्रकाशन, पुणे ३० द्वितीय आवृत्ती, १९९६.